शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

परिपत्रक क्र.५०/२०२५

प्रशासकीय गुणवत्ता अभियान व प्रशासकीय गुणवत्ता पुरस्कार योजनेच्या अंमलबजावणीबाबत

दि. ३० ऑक्टोंबर ते ७ नोव्हेंबर, २०२५

सर्व अधिविभागप्रमुख व विभागप्रमुख यांना कळविण्यांत येते की, **दि. ३० ऑक्टोंबर ते ७ नोव्हेंबर, २०२५** या कालावधीत शिवाजी विद्यापीठात सन २०२५–२६ या वर्षाकरिता प्रशासकीय गुणवत्ता अभियान व प्रशासकीय गुणवत्ता पुरस्कार योजनेची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. सदर योजनेनुसार प्रत्येक अधिविभाग व विभाग यांनी आपल्या विभागाची स्वच्छता करुन घेणेची आहे. याबरोबरच अधिविभाग/विभाग येथील सर्व साहित्य, फर्निचर, उपकरणे, टेबल्स तसेच क्लासरुम, लॅबोरेटरी, भांडार लायब्ररी, ऑफीस मधील नीटनेटकी मांडणी व स्वच्छतेची व्यवस्था करणेची आहे.

सदर योजनेबाबतचे निकष खालीलप्रमाणे:

**अभियानाचे नांव :"प्रशासकीय गुणवत्ता अभियान"(Administrative Excellence Campaign)**

**पुरस्काराचे नांव : "प्रशासकीय गुणवत्ता पुरस्कार"(Administrative Excellence Award)**

प्रशासकीय गुणवत्ता अभियान समितीच्या प्रशासकीय विभाग व अधिविभाग यांना गुणांकन (Marking Scheme) देण्याची पध्दत व निकष खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आले आहेत.

**अधिविभाग गुणांकनाचे निकष :–**

१) शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची संपूर्ण तपशिलासह माहिती.
२) अधिविभागांतर्गत सभेची नोटीस, अजेंडा व कार्यवृत्तांत इ.
३) अधिविभागामध्ये शिकवल्या जाणा–या अभ्यासक्रमांची माहिती.
४) मागील किमान ५ वर्षापासूनचे माजी विद्यार्थ्यांचे पुर्ण तपशिलासह रेकॉर्ड.
५) कार्यालयीन परिपत्रके, कार्यालयीन आदेश, रजा नोंद वही, आवक–जावक रजिस्टर टपाल बुक.
६) प्रवेशित भाग १व भाग २ च्या विद्यार्थ्यांची फोटोसह संपूर्ण माहिती.
७) अधिविभागात राबविलेले विविध उपक्रमांचा तपशिल व त्यासंबंधीची सर्व कागदपत्रे (एका उपक्रमास १ गुण)
८) विद्यापीठ प्रशासनामध्ये अधिविभागाचे योगदानाबाबत माहिती.अभ्यासमंडळ,अधिसभा,विद्यापरिषद सभा, व्यवस्थापन परिषद व समित्या इ.
९) विद्यार्थ्यांच्या नोकरीसंदर्भातील मागील ५ वर्षाची माहिती (Placement Record) व माजी विद्यार्थी मेळाव्याबाबतची माहिती.
१०) विभागातील संशोधन व प्रकल्पाची माहिती.
११) परिषद,सेमिनार,कार्यशाळा, इ. चे आयोजन
१२) ॲक्सेशन नोंद वही (Accession Register)
१३) साठा नोंद वही (Stock Register)
१४) बजेट रेकॉर्ड (Budget Record)
१५) स्टोअर, लॅबोरेटरी, क्लासरुम, कॉमन रुम, लेडीज रुम, फॅकल्टी रुम व हॉल इ. बाबतची देखभाल व्यवस्थापन.
१६) अधिविभागातील मुला/मुलींची तसेच शिक्षकांची स्वच्छतागृहाबाबत व्यवस्थापन
१७) इमारत,भिंती, खिडक्या छत इत्यादींची स्वच्छता
१८) मागील प्रशासकीय गुणवत्ता अभियान समितीच्या सुचनांची पुर्तता
१९) हालचाल नोंद वही
२०) पर्यावरण जागरुकतेविषयी उपक्रमांचे आयोजन

**प्रशासकीय विभागासाठी निकष :—**

१) विभागातील कामाचे स्वरुप (Protocol) रजिस्टर.
२) विभागातील कामाचे वर्गीकरण व (Database) माहितीचे रजिस्टर.
३) विभागात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या माहितीचे रजिस्टर.
(एकूण कार्यरत—नियमित/हंगामी/प्रकल्प/हायरिंग इतर)
४) माहितीच्या अधिकार अधिनियम २००५ (Right to Information Act) बाबतची प्रकरणांचे रजिस्टर.
५) उच्च व सर्वोच्च न्यायालयातील प्रकरणांचे रजिस्टर.
६) विभागातील कामाशी संबंधित दैनंदिन रजिस्टर.
७) सुचना व तक्राराबाबतची नोंद वही.
८) टपाल बुक
९) नागरीकांची सनद आहे का
१०)विभागाची माहिती विद्यापीठाच्या वेबसाईटवर अद्ययावत ठेवली आहे काय.
११) विभागाने विभागातील कार्यरत अधिकारी, कर्मचारी यांच्या सक्षमीकरणासाठी केलेले विशेष प्रयत्न (शैक्षणिक,तांत्रिक, व्यावसायीक )
१२) मागील प्रशासकीय गुणवत्ता अभियान समितीच्या सुचनांची पुर्तता
१३) हालचाल नोंद वही
१४) विभागाने कोणते नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले
१५) साठा नोंदवही
१६) जड संग्रह (डेड स्टॉक) नोंदवही
१७) निर्लेखन नोंदवही
१८) विभागाची विशेष उल्लेखनिय कामगिरी
१९) पर्यावरण मित्र हा उपक्रम राबविण्याबाबतचे योगदान
२०) कर्मचाऱ्यांची शिस्त व वर्तणूकीबाबतचे शेरे

**अध्यास/केंद्राचे निकष :—**

१) शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची संपूर्ण तपशीलासह माहिती
२) अध्यासनांतर्गत सभांची नोटीस,अजेंडा व कार्यवृत्तांत इ.
३) अध्यासनामध्ये शिकविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमांची माहिती.
४) कार्यालयीन परिपत्रके, कार्यालयीन आदेश, रजा नोंदवही, आवक—जावक रजिस्टर, टपाल बुक.
५) अध्यासनाने राबवलेल्या विविध उपक्रमांचा तपशिल व त्यासंबंधीची सर्व कागदपत्रे.(२०गुण) (एका उपक्रमास ५ गुण)
६) बजेट रेकॉर्ड (Budget Record)
७) साठा नोंद वही (Stock Register)
८) डेडस्टॉक नोंद वही (Dead Stock Register)
९) ॲक्सेशन नोंद वही (Accession Register)
१०) अतिथींचे भेटीची नोंद वही (Visit Book)
११) मागील प्रशासकीय गुणवत्ता अभियान समितीच्या सुचनांची पुर्तता

सोबत गुणांकन (Marking Scheme) चा तक्ता जोडला आहे. त्यानुसार तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे २० मुद्यांना प्रत्येकी कमाल ५ गुणांप्रमाणे एकूण १०० गुणांचे गुणांकन असेल. सदरचा कार्यक्रम १८ नोव्हेंबर या विद्यापीठ वर्धापनदिनी आयोजित करण्यांत येणार आहे. तसेच समिती प्रशासकीय गुणवत्ता अभियानांतर्गत गुणवत्ता टिकविण्यासाठी/वाढविण्यासाठी,विभाग/अधिविभागांना आकस्मित भेटी देतील. या अभियानासंदर्भात अधिविभाग/विभागातील स्वच्छता व अन्य अनुषंगिक कामाकरिता ओव्हरटाईम देण्यात येणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

प्रशासकीय गुणवत्ता अभियान व प्रशासकीय गुणवत्ता पुरस्कार योजनेअंतर्गत समिती सदस्यांमार्फत सर्व अधिविभाग/विभाग यांची पाहणी करण्यात येऊन त्याकरिता रोख पारितोषिके, मेमेंटो व प्रमाणपत्र खालीलप्रमाणे देण्यात येणार आहेत.

..३

१. प्र.कुलगुरु,कुलसचिव, संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, वित्त व लेखा अधिकारी अशा चार प्रमुख अधिकारी यांचे अखत्यारीत असलेले सर्व प्रशासकीय विभागामधून प्रत्येकी दोन याप्रमाणे प्रथम व व्दितीय क्रमांकाची एकूण आठ पारितोषिके देण्यात येतील.

२. सर्व शैक्षणिक अधिविभागातून प्रथम, व्दितीय, तृतीय व उत्तेजनार्थ क्रमांकाची एकूण चार पारितोषिके व अध्यास/केंद्रामधून एकूण दोन देण्यात येतील

३. सपोर्ट सर्व्हिसेस विभागामधून प्रथम, व्दितीय, तृतीय व उत्तेजनार्थ क्रमांकाची एकूण चार पारितोषिके देण्यात येतील.

**रोख पारितोषिकाची रक्कम :— प्रथम क्रमांकास रु. ५०००/—, व्दितीय क्रमांकास रु. ३०००/—, तृतीय क्रमांकास रु. २०००/— व उत्तेजनार्थ क्रमांकास रु. १०००/— अधिविभाग व विभाग यांना मेमेंटो व प्रमाणपत्रही प्रदान करण्यात येणार आहे.**

प्रशासकीय गुणवत्ता अभियान व प्रशासकीय गुणवत्ता पुरस्कार योजनेअंतर्गत परीक्षकांची समिती सर्व अधिविभाग व विभाग यांना भेट देईल व त्याप्रमाणे प्रथम, व्दितीय, तृतीय क्रमांकाचे व उत्तेजनार्थ पारितोषिक देण्याबाबत शिफारस करुन मा.कुलगुरु यांना अहवाल सादर करतील.

सर्व अधिविभाग/विभाग यांनी प्रशासकीय गुणवत्ता अभियान व प्रशासकीय गुणवत्ता पुरस्कार योजनेतंर्गत स्वच्छता सप्ताह योजनेत सहभागी होण्याचे आहे.

कुलसचिव

जा.क्र.आस्थापना/प्रशासकीय गुणवत्ता अभियान/ 2052

दि. 18 OCT 2025

प्रति : १. मा.कुलगुरु, मा.प्र—कुलगुरु, मा. कुलसचिव, मा. अधिष्ठाता, संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, मा.वित्त व लेखा अधिकारी यांचे स्वीय सहाय्यक.

२. सर्व अधिविभागप्रमुख, उपकुलसचिव, कायदा अधिकारी, सहा.कुलसचिव, जनसंपर्क अधिकारी.

३ सर्व विभागप्रमुख

४ इंटरनेट विभाग — सदरचे परिपत्रक इंटानेटवर प्रसिध्द करावे.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

परिपत्रक क्र.५१./ २०२५

जा.क्र. आस्थापना/प्र.गु.अ./२०५२, दि. १८ ऑक्टोंबर २०२५ अन्वये दि. ३० ऑक्टोंबर २०२५ ते दि. ०७ नोव्हेंबर, २०२५ या कालावधीत स्वच्छता सप्ताह अंमलबजावणी करणेबाबत कळविण्यात आले होते. त्यास अनुसरून समिती सदस्य प्रशासकीय विभाग, सपोर्ट सर्व्हिसेस विभाग व अधिविभाग यांना खालील वेळापत्रकानुसार भेटी देणार आहेत.

तरी संबंधित प्रशासकीय विभागप्रमुख व अधिविभागप्रमुख तसेच सर्व सेवकांनी सदर कालावधीत रजेवर न जाता उपस्थित राहणे आवश्यक आहे.

**DATE WISE SCHEDULE OF VISIT TO ADMINISTRATIVE SECTIONS**

Time-11.00 a.m. onwards

| Date | Sections |
|---|---|
| 31/10/2025 | Sections under the Director Board of Examination & Revaluation |
| 01/11/2025 | Sections under the Finance & Accounts Officer |
| 03/11/2025 | Sections under the Pro—V.C.Office |
| 04/11/2025 | Support services i.e. Health Centre, Garden, Press, Study Center, Internet, USIC, S.A.I.F, Vidyarthi Bhavan, All Hostels, Guest House, Knowledge Resources Center, Center for the Study of Social Inclusion etc. |
| 06/11/2025 | Sections under the Registrar |
| 10/11/2025 | Report Day |

**DATE WISE SCHEDULE OF VISIT TO P.G. DEPARTMENTS**

Time-11.00 a.m. onwards

| Date | Sections |
|---|---|
| 31/10/2025 | Chemistry, Zoology, Botany, English, Marathi, Hindi, Foreign Language Dr.Babasaheb Ambedker Center for Research & Development |
| 01/11/2025 | Electronics, Physics, Mathematics, Statistics, Env. Science, Agro, Chem,& Pest Mgt., Bio—Chemistry, Bio—Technology, Microbiology, |
| 03/11/2025 | Library & Information Science, Geography, Law. Center for Woman's Studies, Center for Community Deveopment, Lok Vikas Centre, Music & Dramatics,M.A. Mass Commu., Center for Distance and online Education, Sports Deptt,Center for Neharu Studies, Bank of India Chair in Rural Development, Bhagvan Mahavir Chair,United Western Bank's Late Shri R.N Godbole Chair, Maharshi Vitthal Ramji Shinde Chair, Sant Tukaram Chair, Loknete Balasaheb Desai Chair,Late Yashwantrao Chavan Chair, Smt.Shardabai Govidrao Pawar Chair, Late Padmashri G. G. Jadhav Chair in Jernalasim, Late Datta Deshmukh Chair, Lokshahir Anna Bhau Sathe Chair, Punyashlok Abilyadevi Holkar Chair, Sharan Sahitya Adhyason, Krantiargani Dr. G. D. Bapu Lad Adhyasan, Prof. (Dr.) N. D. Patil Lokchalval Adhyasan. |
| 04/11/2025 | Economics, Sociology, Political Science, Psychology, Yashwantrao Chavan School of Rural Development (YCSRD), Center for Gandhian Studies, Commerce & Management, M.B.A., |
| 06/11/2025 | Lifelong learning & Extension, Education, Shahu Research Center, History, Chh Shahu Maharaj Center for Studeis of Matatha History, Center for Skill and Entrepreneurship Development,Center for Leadership Development, Academy for Academic Administration, Space Research Center (Panhala), University Industry Interaction Cell, Rajarshi Shahu Lokvidya and Loksanskruti Study Center, Chh. Sambhaji Maharaj Research Center, Center for Climate Change and Sustainability Studies, Counseling Center, Guruvarya laxmanrao Inamdar Co-operative Training Center, Research and Development Cell, Rusa Center, Center for Nano Fabrics, Faculty Development Center, Knowledge Resoruce Center, International Affairs Cell, Internal Quality Assurance Cell, Intellectual Property Rights( IPR), School of Nano Science and Biotechnology, Food Science & Technology, Computer Science, Journalism & Communication Science, School of Engineering and Technology. Resource Center for Inclusive Education (RCIE), Center of Excellence in Artificial Intelligence for Sustainable Development. |
| 10/11/2025 | Report Day |

सहा.कुलसचिव

जा.क्र. आस्थापना/प्र.गु.अ./२०६९

दि. 24 OCT 2025

**प्रति,** १. सर्व प्रशासकीय विभागप्रमुख, सपोर्ट सर्व्हीसेस विभागप्रमुख व सर्व अधिविभागप्रमुख

२. समन्वयक, इंटरनेट विभाग - सदरचे परिपत्रक INTRANET वर प्रसिध्द करावे.

**टिप :- उपरोक्त वेळापत्रकात काही अपरिहार्य कारणास्तव बदल होवू शकतो.**

**Vishwajit/E:Prashsakiya Gunawatta**

## अंतर्गत कार्यालयीन आदेश :

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील सर्व शिक्षक संवर्गास कळविण्यात येते की, दि. १५/०२/२०२५ रोजीच्या अंतर्गत कार्यालयीन आदेशानुसार सर्व सहाय्यक प्राध्यापक, समन्वयक, प्रोग्रॅम को—ऑर्डीनेटर, कोर्स को—ऑर्डीनेटर यांनी दि. २२/०७/२०२४ ते दि. २१/०३/२०२५ या कालावधीतील आपल्याकडील कामकाजाचा प्रागतिक अहवाल दि. २९/०३/२०२५ पर्यंत तसेच दि. २४/०३/२०२५ पासून सोबत जोडलेल्या विहित नमुन्यानुसार साप्ताहिक अहवाल तयार करून दर आठवडयाच्या सोमवारी डॉ. सी. ए. बंडगर व श्रीमती एस. यू. मोगले यांचेकडे हार्डकॉपीमध्ये सादर करावेत.

Bhinde

उपकुलसचिव

जा.क्र. शिवाजी वि/सीडीओई/159

दिनांक : 21 MAR 2025

प्रती,

सर्व हंगामी शिक्षक संवर्ग

प्रत माहितीसाठी :

संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

## कामकाजाचा प्रागतिक अहवाल
(कालावधी – दि. __ ते दि. ____)

| | | |
|---|---|---|
| ❑ | हंगामी सहाय्यक प्राध्यापकाचे नाव | |
| ❑ | विषय | |
| ❑ | कालावधी | |

| अ.क्र | तपशील | |
|---|---|---|
| 1. | प्रवेश प्रक्रिया - | |
| | अ. चौकशी साठी विभागात आलेले विद्यार्थी | |
| | ब. ऑनलाईन चौकशी | |
| | क. जाहिरात/ इमेज/ माहितीपत्रिका संबधित कामकाज | |
| 2. | ई- कंटेंट - | |
| 3. | व्हिडीओ एडिटिंग - | |
| 4. | स्वयं अध्ययन साहित्य | |
| 5. | संपर्क सत्र | |
| 6. | सर्टिफिकेट कोर्स | |
| 7. | परीक्षा –<br>अ. अंतर्गत मूल्यमापन | |
| | ब. बाह्य मूल्यमापन | |
| | क. परीक्षे संबधी इतर कामकाज | |
| 8. | NAAC/CIQA | |
| 9. | व्याख्यान/ कार्यशाळा | |
| 10. | स्वाध्याय प्रश्न व मूल्यमापन | |
| 11. | एल. एम. एस. हाताळणे | |

| | | |
|---|---|---|
| 12. | अभ्यास केंद्राशी समन्वय | |
| 13. | विद्यार्थी प्रकल्प/ अहवाल मार्गदर्शन | |
| 14. | विद्यार्थी बाबतचे कामकाज | |
| 15. | अभ्यास केंद्राच्या अडचणी व त्यावर केलेले उपाय | |
| 16. | आपणास दिलेल्या समितीबाबतचे कामकाज | |
| 17. | इतर कामकाज | |

**दिनांक :**

**सहा. प्राध्यापक**

**नाव –**

**सही -**

## SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
## Centre for Distance and Online Education

### *Schedule of 'Deeksharambh' (Orientation Session) 2025-2026*

### MA History Programme

| M.A. Part - I (History) Semester – I | | | | |
|---|---|---|---|---|
| **Sr. No.** | **Day & Date** | **Time** | **Topic** | |
| 1. | Monday 08/ 09 / 2025 | 11.30 am to 12.30 pm | • Introduction<br>• Centre for Distance and Online Education<br>• Study Center<br>• ABC ID and DEB ID<br>• Form Submission | • Eligibility Process<br>• Website<br>• Exam Portal<br>• Exam Center etc. |
| | | 12.30 pm to 01.30 pm | • MA History Programme<br>• Programme Structure<br>• Syllabus<br>• Self-Learning Material | • Contact Session<br>• Assignments<br>• Question Paper Pattern<br>• Examination |

| M.A. Part - II (History) Semester – III | | | | |
|---|---|---|---|---|
| **Sr. No.** | **Day & Date** | **Time** | **Topic** | |
| 1. | Tuesday 09/ 09 / 2025 | 11.30 am to 12.30 pm | • Introduction<br>• Admission Process<br>• Form Submission | • Website<br>• Exam Portal<br>• Exam Center etc. |
| | | 12.30 pm to 01.30 pm | • MA History Programme<br>• Programme Structure<br>• Syllabus<br>• Self-Learning Material | • Contact Session<br>• Assignments<br>• Question Paper Pattern<br>• Examination<br>• Research Project |

**Faculty:** Dr. Muphid Mujawar, Assistant Professor (History)

All Orientation Sessions will be conducted through **Google Meet (Online)** by Centre for Distance and Online Education, Shivaji University, Kolhapur

**Google Meet Link:** ***https://meet.google.com/tfb-eqkt-bty***

M.M. Mujawar 26/08/2025
Assistant Professor (History)
Centre for Distance and Online Education

26/8/25
Coordinator
Centre for Distance and Online Education

26/08/2025
Deputy Registrar
Centre for Distance and Online Education

28/08/25
Director
Centre for Distance and Online Education

# SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
# Centre for Distance and Online Education

## Schedule of Orientation Session 2025-2026

| M.A. Part - I (History) Semester – II | | | | |
|---|---|---|---|---|
| **Sr. No.** | **Day & Date** | **Time** | **Topic** | **Faculty** |
| 1. | Monday 09/ 02 / 2026 | 11.30 am to 12.30 pm<br>12.30 pm to 01.30 pm | • Introduction<br>• Sem I Examination Feedback and Discussion<br>• Curriculum for Sem II<br>• Assignments<br>• Upcoming Contact Sessions<br>• On Job Training Information<br>• Sem II Examination and Exam Form Process<br>• ABC ID<br>• Eligibility Process | Dr. Muphid Mujawar |

| M.A. Part - II (History) Semester – IV | | | | |
|---|---|---|---|---|
| **Sr. No.** | **Day & Date** | **Time** | **Topic** | **Faculty** |
| 1. | Tuesday 10/ 02 / 2026 | 11.30 am to 12.30 pm<br>12.30 pm to 01.30 pm | • Introduction<br>• Sem III Examination Feedback<br>• Curriculum for Sem IV<br>• Assignments<br>• Upcoming Contact Sessions<br>• Sem IV Examination and Exam Form Process<br>• Research Project | Dr. Muphid Mujawar |

All Orientation Sessions will be conducted through **Google Meet (Online)** by Centre for Distance and Online Education, Shivaji University, Kolhapur

**Google Meet Link:** *https://meet.google.com/tfb-eqkt-bty*

MMMujawar 4/2/2026
Assistant Professor (History)
Centre for Distance and Online Education

Coordinator
Centre for Distance and Online Education

Bhinde 04/02/2026
Deputy Registrar
Centre for Distance and Online Education

05/02/2026
Director
Centre for Distance and Online Education

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR 416 004, MAHARASHTRA
CENTRE FOR DISTANCE AND ONLINE EDUCATION
PHONE : – 2609105, 2609451, 2609452
www.unishivaji.ac.in, e-mail-cde@unishivaji.ac.in
Estd. 1962
"A++" Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६००४, महाराष्ट्र
दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
दूरध्वनी - ईपीएबीएक्स - २६०९१०५, २६०९४५१, २६०९४५२
www.unishivaji.ac.in, e-mail-cde@unishivaji.ac.in

जा.क्र. शिवाजी वि/सीडीओई/ 383

दिनांक : 07/07/2025

प्रति,
मा.प्राचार्य (केंद्रप्रमुख),
दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण सर्व अभ्यासकेंद्रे,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषय: शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ विद्यार्थी प्रवेशप्रक्रिया कार्यशाळेबाबत.

महोदय/महोदया,

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्यावतीने शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ साठी पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाची प्रवेशप्रक्रिया जून, २०२५ पासून मुख्यालय व कोल्हापूर, सांगली, व सातारा जिल्हयातील विविध अभ्यासकेंद्रामार्फत सुरू झालेली आहे. सदर प्रवेशप्रक्रिये संदर्भात सविस्तर मार्गदर्शन करण्याच्यादृष्टीने चालू शैक्षणिक वर्षामध्ये आपल्या अभ्यासकेंद्रावर कार्यरत असणारे समन्वयक व संबंधित लेखनिक यांची **कार्यशाळा बुधवार दि.०९ जूलै, २०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर** येथे आयोजित करण्यात आली आहे. सदर कार्यशाळेस विद्यापीठाचे दूरशिक्षण केंद्राचे वरिष्ठ अधिकारी त्याचबरोबर विद्यापीठातील आय.टी. विभागाचे व संगणक केंद्राचे अधिकारी खालील बाबींवर मार्गदर्शन करणार आहेत.

1. Online Admission cum examination form process.
2. Electronically Inwarding of application cum examination form.
3. How to Generate ABC ID Number.
4. How to Generate UGC-DEB-ID Number.
5. Duel Degree Online Application.
6. Generation of various reports & submission.
7. Any other item.

तसेच प्रवेशप्रक्रीया सुलभ होण्याच्या दृष्टीने आपल्या सुचना, अडचणी तात्काळ cde@unishivaji.ac.in या ई-मेल वर पाठवून द्याव्यात जेणेकरून कार्यशाळेंमध्ये आपणास मार्गदर्शन करता येईल. सदर कार्यशाळेसाठी आपल्या अभ्यासकेंद्राचे समन्वयक व लेखनिक यांनी वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.
कळावे,

आपला विश्वासू,
Bhinde
उपकुलसचिव

प्रत – १. सर्वसाधारण बांधकाम व देयके विभाग
२. परीक्षा विभाग
३. संगणक केंद्र
४. दूरशिक्षण प्रवेश विभाग

<u>महत्वाची टिप</u> : उपस्थित सदस्यांनी आपल्या बॅकेचे नांव, खाते नंबर व IFSC Code इ. बाबी प्रवास भत्ते देयकामध्ये बिनचूक नमूद करणे आवश्यक आहे.

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021)
With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

### दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील समन्वयक व लेखनिकांसाठी प्रवेशप्रक्रिया कार्यशाळा अहवाल

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने आयोजित कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्हयांतील ८४ महाविद्यालयाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण अभ्यासकेंद्रातील समन्वयक व लेखनिकांसाठी शैक्षणिक वर्ष २०२५ – २६ साठीची प्रवेशप्रक्रिया माहिती देण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन बुधवार दि. ०९ जुलै २०२५ रोजी सकाळी ११.३० वा. मुख्य कार्यालयातील खोली नं. ३०९ मध्ये केलेले होते. यावेळी शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.व्ही.एन.शिंदे, अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. तसेच दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे प्रभारी संचालक डॉ. के. बी. पाटील, संगणक केंद्राचे प्रभारी संचालक, श्री. ए. ए. रेडेकर, दूरशिक्षण केंद्राचे उपकुलसचिव, श्री. व्ही. बी. शिंदे, सहाय्यक कुलसचिव श्री. दिलीप मोहाडीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच संगणक केंद्रातील सिस्टीम प्रोग्रामर श्री.आशिष घाटे, आय.टी. प्रतिनिधी श्री. अमोल आडगुळे हे उपस्थित होते.

बदलत्या जागतिकीकरणाच्या परिस्थितीत शिक्षण व्यवस्थेत मोठ्या प्रमाणात बदल होत असताना दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण ही आजची गरज असल्याचे प्रतिपादन कुलसचिव डॉ.व्ही. एन.शिंदे यांनी केले. आज विद्यार्थी संख्या घटत असल्याचे प्रमाण वाढत चाललेले आहे. त्यासाठी १९९१ चे खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरण धोरण कारणीभूत आहे. अभिमत विद्यापीठे, खाजगी विद्यापीठे आणि स्वायत महाविद्यालयांची विद्यार्थी संख्या वाढत आहे. वारेमाप पैसा गुंतवून कोणतेही शिक्षण घेता येते याचे हे द्योतक आहे. पारंपारिक महाविद्यालयाच्या अभ्यासक्रमातील बदला मध्ये होणारा विलंब हे ही कारण विद्यार्थी संख्या कमी होण्यामागे आहे. आजच्या शिक्षण व्यवस्थेत दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण हे दोनच घटक महत्वाचे आहेत. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील महाविद्यालयाच्या अभ्यासकेंद्रातील आपण समन्वयक व लेखनिक शिक्षण क्षेत्रात समाजसेवक म्हणून काम करीत आहात. शिक्षणापासून वंचित असणाऱ्यांना आपण शैक्षणिक सेवा देवून शिक्षणाच्या प्रवाहात आणत आहात. ही गोष्ट कौतुकास्पद आहे.विद्यार्थ्यांना प्रोफेशनल पद्धतीने प्रामाणिकपणे सेवा दिल्यास विद्यार्थी संख्या वाढीस लागणार आहे. पत्रातून शिक्षण ते ऑनलाईन शिक्षण हा प्रवास शिक्षण क्षेत्रात थक्क करणारा आहे. त्यासाठी माजी विद्यार्थी यांचे संघटन करणे गरजेचे आहे. शिवाजी विद्यापीठाची पदवी विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे मा. कुलसचिव यांनी सांगितले.


सदर कार्यशाळेत जिजामाता महाविद्यालय, दुर्गमानवाड ता.राधानगरी समन्वयक डॉ.अक्षय पाटील, संग्रामसिंह शेटे, गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालय, कोल्हापूर समन्वयक डॉ. निलेश सुसवारे यांचा नवीन अभ्यासकेंद्र सुरु केलेबद्दल मा.कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे पुस्तक देवून सत्कार करण्यात आला. इंग्लंडमधील बाथ विद्यापीठामध्ये बी.एस्सी.फायनान्स पदवी पूर्ण करून दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या एम.ए.अर्थशास्त्र प्रथम वर्षात प्रवेश घेतलेबद्दल कु. दिया आवाडे यांना स्वयं अध्ययन साहित्य मा.कुलसचिव डॉ.व्ही.एन.शिंदे यांच्या हस्ते देवून विद्यापीठाच्यावतीने सत्कार करण्यात आला.

संगणक केंद्राचे संचालक श्री. रेडेकर म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडविल्यास विद्यार्थी संख्या वाढीचा दर वाढेल. शिक्षण व्यवस्थेत होत असलेले बदल प्रामाणिकपणे स्वीकारले पाहिजेत. विद्यार्थ्यांना उच्च दर्जेदार शिक्षण, कौशल्यावर आधारित शिक्षण आणि रोजगारभिमुख शिक्षण दिले पाहिजे. या कार्यशाळेत संगणक विभागातील सिस्टीम प्रोग्रामर श्री.आशिष घाटे यांनी ऑनलाईन प्रवेश अर्ज भरणे, ABC ID/ DEB ID  तयार करणे व दुहेरी पदवी बाबत सहाय्यक प्राध्यापक डॉ.मुफिद मुजावर यांनी प्रात्यक्षिक दाखविले. यावेळी अभ्यासकेंद्राच्या कामकाजाबाबत प्रभारी संचालक यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यशाळेसाठी एकूण ४६ अभ्यासकेंद्रातील ६६ समन्वयक व लेखनिक यांनी सहभाग घेतला होता. कार्यशाळेचे स्वागत समन्वयक डॉ. चांगदेव बंडगर प्रास्ताविक संचालक डॉ. के. बी. पाटील यांनी केले. सूत्रसंचालन सहाय्यक प्राध्यापक डॉ.नितीन रणदिवे यांनी केले तर आभार उपकुलसचिव श्री. व्ही. बी. शिंदे यांनी मानले.

Bshinde 04/08/2025

उपकुलसचिव
दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


महा न्यूज & व्ह्यूज




# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण आजची गरज : डॉ. विलास शिंदे

कोल्हापूर, : (महान्यूज अँड व्ह्यूज ):

सद्यस्थितीत शिक्षण व्यवस्थेत मोठ्या प्रमाणात बदल होत असताना दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण ही आजची गरज असल्याचे प्रतिपादन कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी केले.



शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील ८७ अभ्यास केंद्रांतील समन्वयक व लेखनिक यांच्यासाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीच्या प्रवेश प्रक्रियेबाबत माहिती देण्यासाठी आयोजित कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. या वेळी संचालक डॉ. कृष्णा पाटील, संगणक विभागाचे संचालक अभिजीत रेडेकर यांच्यासह उपकुलसचिव व्ही.बी. शिंदे, सिस्टीम प्रोग्रामर आशिष घाटे, आय.टी. प्रतिनिधी अमोल आडगुळे, सहाय्यक कुलसचिव दिलीप मोहाडीकर उपस्थित होते.

डॉ.शिंदे म्हणाले, आज विद्यार्थी संख्या घटण्याचे प्रमाण वाढत आहे. अभिमत विद्यापीठे, खाजगी विद्यापीठे आणि स्वायत्त महाविद्यालयांची विद्यार्थी संख्या वाढत आहे. वारेमाप पैसा गुंतवून कोणतेही शिक्षण घेता येते, याचे हे द्योतक आहे. पारंपरिक महाविद्यालयांच्या अभ्यासक्रमातील बदलांमध्ये होणारा विलंब हेही कारण विद्यार्थी संख्या कमी होण्यामागे आहे. आजच्या शिक्षण व्यवस्थेत दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण हे घटक महत्त्वाचे आहेत. याद्वारे गरजू आणि वंचित यांना शैक्षणिक सेवा प्रदान करण्याचे महत्त्वाचे कार्य साध्य होते. विद्यार्थ्यांना प्रोफेशनल पद्धतीने प्रामाणिकपणे सेवा दिल्यास विद्यार्थी संख्या निश्चितपणे वाढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अभिजीत रेडेकर म्हणाले, विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडविल्यास विद्यार्थी संख्या वाढीचा दर वाढेल. शिक्षण व्यवस्थेत होणारे सकारात्मक बदल प्रामाणिकपणे स्वीकारले पाहिजेत. विद्यार्थ्यांना दर्जेदार, कौशल्यावर आधारित आणि रोजगाराभिमुख शिक्षण दिले पाहिजे.

कार्यशाळेत आशिष घाटे, डॉ. मुफिद मुजावर यांनी विविध प्रात्यक्षिके सादर केली. अभ्यासकेंद्राच्या कामकाजाबाबत डॉ. सूर्यकांत गायकवाड, डॉ.नितीन रणदिवे, डॉ.सचिन भोसले, डॉ.सुशांत माने, डॉ.प्रवीण लोंढे, बबन पाटोळे यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेत ४६ अभ्यास केंद्रांतील ६६ समन्वयक आणि लेखनिक यांनी सहभाग घेतला.

यावेळी इंग्लंडमधील बाथ विद्यापीठामध्ये बी.एससी. (फायनान्स) पदवी पूर्ण करून दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या एम.ए. (अर्थशास्त्र) प्रथम वर्षात प्रवेश घेतल्याबद्दल कु. दिया आवाडे यांना कुलसचिव डॉ. शिंदे यांच्या हस्ते स्वयं अध्ययन साहित्य देण्यात आले.

कार्यशाळेचे समन्वयक डॉ.चांगदेव बंडगर स्वागत केले. संचालक डॉ. पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नितीन रणदिवे यांनी सूत्रसंचालन केले, तर उपकुलसचिव शिंदे यांनी आभार मानले.

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण आजची गरज : डॉ. विलास शिंदे

**कोल्हापूर/प्रतिनिधी :**

सद्यस्थितीत शिक्षण व्यवस्थेत मोठ्या प्रमाणात बदल होत असताना दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण ही आजची गरज असल्याचे प्रतिपादन कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या वतीने कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील ८७ अभ्यास केंद्रातील समन्वयक व लेखनिक यांच्यासाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ साठीच्या प्रवेश प्रक्रियेबाबत माहिती देण्यासाठी आयोजित कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. या वेळी संचालक डॉ. कृष्णा पाटील, संगणक विभागाचे संचालक अभिजीत रेडेकर यांच्यासह उपकुलसचिव व्ही.बी. शिंदे, सिस्टीम प्रोग्रामर आशिष घाटे, आय.टी. प्रतिनिधी अमोल आडमुळे, सहाय्यक कुलसचिव दिलीप मोहाडीकर उपस्थित होते.

डॉ.शिंदे म्हणाले, आज विद्यार्थी संख्या घटण्याचे प्रमाण वाढत आहे. अभिमत विद्यापीठे, खाजगी विद्यापीठे आणि स्वायत्त महाविद्यालयांची विद्यार्थी संख्या वाढत आहे. यारेमाप पैसा गुंतवून कोणतेही शिक्षण घेता येते, याचे हे द्योतक आहे. पारंपरिक महाविद्यालयांच्या अभ्यासक्रमातील बदलांमध्ये होणारा विलंब हेही कारण विद्यार्थी संख्या कमी होण्यामागे आहे. आजच्या शिक्षण व्यवस्थेत दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण हे घटक महत्त्वाचे आहेत. याद्वारे गरजू आणि वंचित यांना शैक्षणिक सेवा प्रदान करण्याचे महत्त्वाचे कार्य साध्य होते. विद्यार्थ्यांना प्रोफेशनल पद्धतीने प्रामाणिकपणे सेवा दिल्यास विद्यार्थी संख्या निश्चितपणे वाढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अभिजीत रेडेकर म्हणाले, विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडविल्यास विद्यार्थी संख्या वाढीचा दर वाढेल. शिक्षण व्यवस्थेत होणारे सकारात्मक बदल प्रामाणिकपणे स्वीकारले पाहिजेत. विद्यार्थ्यांना दर्जेदार, कौशल्यावर आधारित आणि रोजगाराभिमुख शिक्षण दिले पाहिजे. कार्यशाळेत आशिष घाटे, डॉ. मुनिर मुजावर यांनी विविध प्रात्यक्षिके सादर केली. अभ्यासकेंद्राच्या कामकाजाबाबत डॉ. सूर्यकांत गायकवाड, डॉ.नितीन रणदिवे, डॉ.सचिन भोसले, डॉ.सुशांत माने, डॉ.प्रवीण लोंढे, बबन पाटोळे यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेत ४६ अभ्यास केंद्रांतील ६६ समन्वयक आणि लेखनिक यांनी सहभाग घेतला. बायंकळी



इंग्लंडमधील बाथ विद्यापीठामध्ये बी.एस्सी. (फायनान्स) पदवी पूर्ण करून दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या एम.ए. (अर्थशास्त्र) प्रथम वर्षात प्रवेश घेतल्याबद्दल कु. दिया आवाडे यांना कुलसचिव डॉ. शिंदे यांच्या हस्ते स्वयं अध्ययन साहित्य देण्यात आले. कार्यशाळेचे समन्वयक डॉ.चांगदेव बंडगर स्वागत केले. संचालक डॉ. पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. नितीन रणदिवे यांनी सूत्रसंचालन केले, तर उपकुलसचिव शिंदे यांनी आभार मानले.

Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC (2021)
With CGPA 3.52

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR 416 004, MAHARASHTRA
CENTRE FOR DISTANCE AND ONLINE EDUCATION
PHONE : – 2609105, 2609451, 2609452
www.unishivaji.ac.in, e-mail: cde_sim@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६००४, महाराष्ट्र
दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
दूरध्वनी – ईपीएबीएक्स – २६०९१०५, २६०९४५१, २६०९४५२
www.unishivaji.ac.in, e-mail: cde_sim@unishivaji.ac.in

जा.क्र. शिवाजी वि/सीडीओई/88 दिनांक : 13 FEB 2025

प्रति,

| | |
|---|---|
| प्रा. (डॉ.) एम.एस.देशमुख,<br>मा अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,<br>शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | प्रा.(डॉ.) प्रभंजन माने,<br>मा अध्यक्ष, इंग्रजी अभ्यासमंडळ,<br>इंग्रजी अधिविभाग शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर |
| डॉ. प्रकाश कुंभार<br>डॉ. एम. एच. शिंदे आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज,<br>तिसंगी, ता गगनबाबडा जि कोल्हापूर | डॉ. अरविंद जाधव,<br>यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स, कराड,<br>ता. कराड, जि. सातारा |
| डॉ अरुधंती जयसिंगराव पवार<br>न्यू कॉलेज, शिवाजी पेठ, कोल्हापूर,<br>जि. कोल्हापूर | डॉ. ज्ञानदेव काळे,<br>आर्टस ॲन्ड कॉमर्स कॉलेज,मेढा, ता जावळी<br>जि सातारा |
| डॉ. बाळकृष्ण वाघमारे,<br>क्रांतीअग्रणी जी. डी. बापू लाड कॉलेज, कुंडल,<br>ता.पलूस, जि. सांगली | डॉ. वैजयंता पाटील<br>जयवंत महाविद्यालय, इचलकरंजी,<br>ता हातकणंगले, जि कोल्हापूर |
| डॉ. मनोज गुजर<br>प्रा. संभाजीराव कदम कॉलेज, देऊर, ता. कोरेगाव,<br>जि. सातारा. | डॉ. भगवान लोकडे<br>डी.पी. भोसले कॉलेज, कोरेगाव,<br>ता. कोरेगाव, जि. सातारा |
| डॉ. कल्पना गंगातीकरकर<br>महावीर महाविद्यालय, ७/ई भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर | डॉ. राजेंद्र थोरात<br>वेणुताई चव्हाण कॉलेज, कराड, ता.कराड जि सातारा |
| डॉ. तेजस्विनी डांगे—पाटील,<br>आर्टस, कॉमर्स ॲन्ड सायन्स कॉलेज, कासेगाव,<br>ता. वाळवा, जि. सांगली ४१५ ४०४ | डॉ. उत्तम रामचंद्र पाटील,<br>नाईट कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड कॉमर्स,<br>आझाद चौक, कोल्हापूर |
| डॉ. उज्वला पाटील<br>डॉ पतंगराव कदम कॉलेज रामानंदनगर (बुर्ली)<br>पोस्ट किर्लोस्करवाडी, ता. पलूस जि. सांगली | डॉ. साबिया फरास<br>राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कदमवाडी रोड,<br>कोल्हापूर जि. कोल्हापूर |
| डॉ. शंशाक माने,<br>जयसिंगपूर कॉलेज, जयसिंगपूर, ता. शिरोळ<br>जि. कोल्हापूर | डॉ. वैशाली जोशी,<br>श्रीमती मथूबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली |
| डॉ. आप्पासाहेब आरबोळे,<br>आर्टस कॉलेज कोवाड ता चंदगड जि. कोल्हापूर | डॉ. संतोष राजगुरु<br>बळवंत कॉलेज विटा, ता खानापूर जि सांगली |
| डॉ. शुंभागी जरंडीकर,<br>व्यंकटेश महाविद्यालय इचलकरंजी<br>ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | डॉ. गणेश विजयकुमार जाधव,<br>धनजंयराव गाडगीळ कॉलेज ऑफ कॉमर्स, सातारा<br>जि सातारा |

विषय : बी.ए. व बी. कॉम भाग २ इंग्रजी विषयाच्या स्वयं अध्ययन साहित्यासंदर्भात आयोजित कार्यशाळेबाबत.

महोदय/ महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२५ – २०२६ साठी सुधारित करण्यात येत असलेल्या बी.ए. व बी.कॉम भाग २ इंग्रजी विषयाच्या अभ्यासक्रमाप्रमाणे दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राकडे प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्याकरिता स्वयंअध्ययन साहित्य तयार करावयाचे आहे. याबाबत **मंगळवार दि. १८/०२/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.** तरी सदर कार्यशाळेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती

आपला विश्वासू

सहाय्यक कुलसचिव

## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
## बी.ए. व बी. कॉम भाग २ इंग्रजी विषयाच्या स्वयं अध्ययन साहित्य निर्मिती संदर्भातील दि.१८/०२/२०२५ रोजीच्या कार्यशाळेचा इतिवृत्तांत

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार शैक्षणिक वर्ष २०२५ – २०२६ साठी सुधारित करण्यात आलेल्या बी.ए. भाग २ व बी. कॉम भाग २ इंग्रजी विषयाच्या अभ्यासक्रमाप्रमाणे स्वयं अध्ययन साहित्य तयार करणेसाठी दि. १८/०२/२०२५ रोजी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र येथे इंग्रजी विषयाच्या लेखकांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यशाळेस इंग्रजी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष प्रा. (डॉ.) प्रभंजन माने, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे उपकुलसचिव डॉ. व्ही. बी. शिंदे, सहाय्यक कुलसचिव श्री डी. एल. मोहाडीकर, हंगामी सहाय्यक प्राध्यापक डॉ. प्रकाश बेळ्ळीकट्टी,डॉ. संजय चोपडे आणि इंग्रजी विषयाचे लेखक उपस्थित होते.

कार्यशाळेच्या सुरुवातीला दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रांचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. प्रकाश बेळ्ळीकट्टी यांनी उपस्थितांचे स्वागत करुन कार्यशाळेच्या आयोजनाबाबतची माहिती दिली यानंतर दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे उपकुलसचिव डॉ व्ही. बी. शिंदे यांनी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राकडे प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या दृष्टीने स्वयंअध्ययन साहित्याचे महत्व नमूद केले. स्वयंअध्ययन साहित्य वेळेत प्राप्त झाले नाही तर विद्यार्थ्यांना अध्ययन करणे अडचणीचे होते त्यामुळे या केंद्रास विद्यार्थी व पालक यांच्या रोषास समोरे जावे लागते. सदरची बाब विचारात घेवून सर्व लेखकांनी आपले घटक लेखन वेळेत सादर करावे अशी विनंती केली.

यानंतर इंग्रजी अभ्यासमंडळाचे अध्यक्ष प्रा. (डॉ.) प्रभंजन माने यांनी उपस्थितांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० प्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२५ – २०२६ साठी तयार करण्यात आलेला इंग्रजी विषयाचा बी.ए. भाग २ व बी. कॉम भाग २ चा अभ्यासक्रम व त्यानुसार तयार करावे लागणारे स्वयंअध्ययन साहित्य याबाबत उपस्थितांना माहिती दिली. तसेच स्वयंअध्ययन साहित्याचे स्वरुप त्यानुसार घटक लेखन व संपादन करीत असतांना घ्यावयाची काळजी, कॉपी राइट व इतर बाबीसंदर्भात उपस्थितांना मार्गदर्शन केले व सर्व लेखकांनी आपले घटक लेखन दर्जेदार व वेळेत सादर करावे असे सूचित केले.

कार्यशाळेवेळी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राकडून यापुर्वीच्या अभ्यासक्रमाप्रमाणे तयार करण्यात आलेले बी.ए. भाग २ व बी.कॉम भाग २ इंग्रजी विषयाचे स्वयंअध्ययन साहित्य व सुधारित अभ्यासक्रम यांची पडताळणी करण्यात आली व सुधारित अभ्यासक्रमास अनुसरुन ते नव्याने तयार करण्याचे निश्चित करण्यात आले. यानंतर सदर स्वयं अध्ययन साहित्य तयार करण्यासाठी लेखक व संपादक निश्चित करुन घटक लेखन व संपादन कामाचे वाटप करण्यात आले. कार्यशाळेवेळी खालील बाबी निश्चित करण्यात आल्या

1. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राकडे प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार शैक्षणिक वर्ष २०२५ – २०२६ साठी सुधारित करण्यात आलेल्या इंग्रजी विषयाच्या बी.ए. भाग २ व बी. कॉम भाग २ च्या अभ्यासक्रमातील खालील पेपरचे स्वयंअध्ययन साहित्य नव्याने तयार करण्याचे निश्चित करण्यात आले.

| | |
|---|---|
| १ | BA Part II Sem III Introduction to English Literature (One Act Play) and Language (Speech Mechanism) – III, Sem. IV Introduction to English Literature: Novel and Language: Phonology |
| २ | BA Part II Sem III Indian English Literature: Indian English Poetry and Drama, Sem IV Indian English Literature: Essay and Novel |
| ३ | BA Part II Sem III Ability Enhancement Course (AEC) : Paper C English for Communication Sem IV Ability Enhancement Course (AEC) Paper D English for Communication |
| ४ | BA Part II IKS : Introduction to Indian Poetics |
| ५ | B.Com. Part II Sem III English for Business Communication – III, Sem. IV English for Business Communication - IV |

2. कार्यशाळेवेळी नियुक्त सर्व लेखकांनी आपले घटक लेखन दि. २५/०३/२०२५ पुर्वी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राकडे जमा करावे असे सर्वानुमते निश्चित करण्यात आले.

कार्यशाळेच्या शेवटी डॉ संजय चोपडे यांनी उपस्थितांचे आभार मानून कार्यशाळा समाप्त झाल्याचे घोषित केले.

( डॉ. प्रकाश बेळ्ळीकट्टी )
हंगामी सहाय्यक प्राध्यापक इंग्रजी

प्रा. (डॉ.) प्रभंजन माने
अध्यक्ष, इंग्रजी अभ्यासमंडळ
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर